19 MAR 2026

सिंधुदुर्ग समाचार

# राष्ट्रीय 'टेक्नोसिस २०२६' स्पर्धेत २०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी (तंत्रज्ञान अधिविभाग, DOT) 'टेक्नोसिस २०२६' या राष्ट्रीय स्पर्धेचे रसायन अभियांत्रिकी शाखेतर्फे आयोजन करण्यात आले. विविध महाविद्यालयांतील दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट मॉडेल, क्विझ, प्रॉडक्ट मॉडलिंग, गेमिंग व रील मेकिंग, या स्पर्धेत सहभाग घेतला.

या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते, तर प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर अध्यक्षस्थानी होते. डॉ. देशमुख यांनी आपल्या भाषणात ध्येय, ज्ञान व अथक परिश्रम ही यशस्वी होण्याची त्रिसूत्री असल्याचे सांगितले. शाश्वत विकासासाठी इंजिनिअरिंगचा उपयोग कसा करता येईल, या दृष्टीने काम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. कोळेकर यांनी शाश्वत विकासाच्या तंत्रज्ञानाची मोठी आवश्यकता असल्याचे सांगितले.

स्पर्धा समन्वयक डॉ. श्रीपाल गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. अरीबा पटेल आणि अक्षदा शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. रक्षिता भोईर आणि संदेश गुळमकर यांनी आभार मानले.

19 MAR 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाला राष्ट्रीय युवा महोत्सवात विजेतेपद

कोल्हापूर, ता. १८ : नवी दिल्लीतील असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजतर्फे चेन्नईतील सत्यभामा विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या २९ जणांच्या संघाने ललितकला विभागातील सर्वसाधारण विजेतेपदाच्या चषकावर नाव कोरले.



कोल्हापूर : राष्ट्रीय युवा महोत्सवातील ललित विभागात शिवाजी विद्यापीठाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपदावर नाव कोरले.

संघाने मातीकाम, रांगोळी, वक्तृत्व (हिंदी) या प्रकारांत प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक पटकविले. सांस्कृतिक शोभायात्रा, पाश्चिमात्य एकल गायन, पाश्चिमात्य समूह गायन, सुगम गायन प्रकारात द्वितीय, तर शास्त्रीय तालवाद्य प्रकारात तृतीय, व्यंगचित्र प्रकारामध्ये पाचवा क्रमांक मिळविला. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. टी. एम. चौगले, एस. टी. आडके यांचे मार्गदर्शन लाभले.

19 MAR 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वयंसिद्धा उपक्रमातून महिलांचे सामाजिक नेतृत्व घडेल : डॉ. प्रशांत नारनवरे




**कोल्हापूर/प्रतिनिधी :**
स्वयंसिद्धा उपक्रमाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होऊन सक्षम सामाजिक नेतृत्व निर्माण होईल, असा विश्वास महाराष्ट्राच्या राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी आज येथे व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठात बेटी बचाव अभियान, विद्यार्थी विकास विभाग आणि स्वयंसिद्धा सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वयंसिद्धा, स्त्रीशक्ती पोर्टल आणि आदिशक्ती' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून ऑनलाईन मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी होत्या.

डॉ. नारनवरे म्हणाले, महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, रोजगार आणि सक्षमीकरण ही त्रिसूत्री अत्यंत महत्त्वाची आहे. या त्रिसूत्रीच्या आधारावर महिलांना सक्षम करून त्यांच्यातून नेतृत्व विकसित करण्याची गरज आहे. विशेषतः महिलांचा कार्यबलातील सहभाग वाढविणे ही आजघडीसाठी महत्त्वाची बाब आहे. स्वयंसिद्धा पोर्टल हे केवळ सोशल प्लॅटफॉर्म नसून शैक्षणिक व व्यावसायिक संवादाचे प्रभावी माध्यम असून विद्यार्थिनींनी व महिलांनी या पोर्टलचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. या प्लॅटफॉर्मद्वारे कौशल्यविकास, प्रशिक्षण, ऑनलाइन कोर्सेस, तसेच उद्योजकतेच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. तसेच, विविध उपक्रम, प्रशिक्षण आणि इंटर्नशिपच्या माध्यमातून महिलांची रोजगारक्षमता वाढविण्याबाबत शासन गंभीर आहे. डिजिटल माध्यमांचा योग्य वापर करून महिलांनी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्यपाल महोदयांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसिद्धा उपक्रमाला बळकटी देण्यात येत असून येणाऱ्या काळात या माध्यमातून उद्योजकीय आणि सामाजिक नेतृत्व मोठ्या प्रमाणात तयार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी लोकभवनचे अवर सचिव (शिक्षण) विकास कुलकर्णी यांनीही ऑनलाईन संवाद साधला. ते म्हणाले, स्वयंसिद्धा व स्त्रीशक्ती पोर्टल हे महिलांसाठी महत्त्वाचे डिजिटल व्यासपीठ असून यावर जास्तीत जास्त नोंदणी करून सक्रिय सहभाग आवश्यक आहे. केवळ नोंदणी करून न थांबता विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन त्याची नोंद पोर्टलवर करणे गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थिनींच्या कामाचा डिजिटल ठसा निर्माण होऊन त्यांच्या प्रगतीचा मागोवा घेता येतो.

या पोर्टलच्या प्रभावी वापरातून विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास साधता येऊ शकतो, असे सांगून ते म्हणाले, पोर्टलच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक आणि कौशल्यविकासाशी संबंधित उपक्रमांचे दस्तऐवजीकरण होऊन विद्यार्थिनींना प्रत्यक्ष अनुभव मिळतो. शासन निर्णय समजून घेणे, सामाजिक जीवनात सक्रिय सहभाग घेणे आणि विविध योजनांमध्ये योगदान देणे हेही महिलांच्या सक्षमीकरणाचा महत्त्वाचा भाग आहे.

कार्यशाळेत एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या स्वयंसिद्धा नोडल ऑफिसर डॉ. अनुराधा पोतदार यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मार्गदर्शन केले. शिक्षण, कौशल्यविकास आणि शासकीय योजनांचा प्रभावी वापर यांद्वारे महिलांचे सक्षमीकरण साधता येते, असे सांगताना त्या म्हणाल्या, स्वयंसिद्धाच्या माध्यमातून शहरी, ग्रामीण तसेच आदिवासी भागातील प्रत्येक महिलेला जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. या पोर्टलवर नोंदणी करून महिलांना शिक्षण, प्रशिक्षण आणि विविध उपक्रमांमध्ये सहभागी होता येते. कौशल्याधारित प्रशिक्षण देणे ही काळाची गरज असून विद्यार्थिनींना रोजगाराभिमुख बनविण्यासाठी याचा मोठा उपयोग होतो. सुकन्या योजना, लखपती दीदी यांसारख्या शासकीय योजनांचा लाभ पात्र महिलांपर्यंत पोहोचविण्याच्या कामी विद्यार्थिनींनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. आरोग्य, सुरक्षा, आर्थिक सक्षमीकरण आणि भारतीय ज्ञान प्रणाली या घटकांवर भर देत असतानाच महिलांनी स्वतःच्या हक्कांसाठी आणि समाजात सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी आवाज उठवणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, आज राज्यात स्वयंसिद्धा पोर्टलवर नोंदणी करण्यात शिवाजी विद्यापीठ अग्रेसर आहे. पण हे अग्रेसरत्व नोंदणीपुरते मर्यादित न राहता महिलाविषयक प्रश्न, अनुभव, समस्या निवारण आदींविषयक चर्चेचे सर्वंकष व्यासपीठ म्हणून पुढे येणे अभिप्रेत आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने त्याचा उद्देश सफल होईल. महिला दिनासह अनेक प्रसंगांचे उत्सवीकरण टाळून त्यांचा विचारांच्या देवाणघेवाणीसाठी उपयुक्त वापर केला पाहिजे. शिक्षण, स्वास्थ्य, स्वावलंबन, सामाजिक न्याय, संवेदनशीलता आणि समानता या सहा बाबींवरच महिलांचे सक्षमीकरण अवलंबून आहे. त्यामुळे त्या प्रत्येक महिलेला कशा प्रदान करता येतील, यादृष्टीने पोर्टलवर चर्चा घडवून आणत राहणे अगत्याचे आहे.

सुरवातीला प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते रोपास पाणी वाहून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. बेटी बचाव अभियानाच्या डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. उज्ज्वला बिर्जे, सुप्रिया वडर यांनी सूत्रसंचालन केले, तर आकाश ब्राह्मणे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह विविध संलग्नित महाविद्यालयांतील स्वयंसिद्धा समन्वयक, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

19 MAR 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निसर्गाच्या शाळेनं शिकवलं; तेच लोकांना सांगते : बीजमाता 'पद्मश्री' राहीबाई पोपेरे

कोल्हापूर/प्रतिनिधी :

मी कोणत्याही शाळेत शिकले नाही, पण निसर्गाच्या शाळेनं मला जगण्याचं खरं शिक्षण दिलं, तेच मी लोकांना सांगत असते, असं अत्यंत प्रांजळपणानं सांगत बीजमाता 'पद्मश्री' राहीबाई पोपेरे यांनी आपल्या आयुष्यभराच्या कार्याचे इंगित उलगडले. शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या पद्माराजे स्मृती व्याख्यानमालेत त्यांनी माती, निसर्ग, जंगल आणि रानभाज्या जपण्याचे महत्त्व अधोरेखित करतानाच मानवी जीवन, शेती आणि पर्यावरण यांच्यातील अतूट नात्याची प्रेरक आणि हृदयस्पर्शी मांडणी केली.

शिवाजी विद्यापीठाचे कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, पर्यावरणशास्त्र अधिविभाग, यशवंतराव चव्हाण सेंटर फॉर रुरल डेव्हलपमेंट आणि समाजशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमती पोपेरे यांचे 'देशी बियांचे संवर्धन आणि स्त्रियांची भूमिका' या विषयावर विशेष व्याख्यान आज झाले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या. व्याख्यानाला कोल्हापूरसह जिल्ह्यातील शेतकरी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या राहीबाई पोपेरे यांनी आपल्या सुमारे तासभराच्या अतिशय ओघवत्या भाषणामध्ये स्वतःच्या आयुष्यातील संघर्ष, गरिबी आणि अनुभव यांमधून घेतलेले धडे सांगितले आणि विचार करायला प्रवृत्त केले. त्या म्हणाल्या, निसर्गच आपला खरा गुरु आहे. माती चांगली असेल तर अन्न चांगले येते, अन्न चांगले असेल तर माणूस निरोगी राहतो आणि पुढची पिढी सुदृढ घडते. रासायनिक शेतीमुळे वाढणारे आजार, बदलती जीवनशैली आणि पारंपरिक अन्नधान्यापासून दूर जाण्याचे दुष्परिणाम स्वतःच्या आयुष्यात भोगले. त्यामुळेच देशी वाणांकडे वळले. पूर्वीच्या काळात रानभाज्या, कंदमुळे आणि स्थानिक धान्य खाल्ल्यामुळे लोक दीर्घायुषी आणि निरोगी होते. आज मात्र आपण पैशाने विष खरेदी करून खात आहोत.

राहीबाईंनी पारंपरिक बियाण्यांचे जतन, सेंद्रिय शेती आणि 'किचन गार्डन' या संकल्पनांवर विशेष भर दिला. प्रत्येक घरात, प्रत्येक शेतात आणि अगदी शाळांच्या परिसरातही भाजीपाला पिकवण्याचे आवाहन त्यांनी केले. दिसायला सुंदर असलेले अन्न नेहमी आरोग्यासाठी चांगले असेलच असे नाही. कमी खा, पण शुद्ध, सात्विक खा, असा संदेश त्यांनी दिला.

जंगल आणि पर्यावरण संरक्षणाबाबत त्या म्हणाल्या, जंगल आपली माऊली आहे. जंगल जाळून आपण स्वतःचं नुकसान करतो. त्यात असंख्य जीवांचा जीव जातो. निसर्ग वाचवायचा असेल तर झाडे, रानभाज्या आणि जैवविविधता जपली पाहिजे. रानभाज्यांचे औषधी गुणधर्म, पारंपरिक बियाण्यांचे महत्त्व आणि स्थानिक अन्नपद्धतीचे वैज्ञानिक मूल्य नव्या पिढीने जाणून ते आचरणात आणण्याचे कळकळीचे आवाहन त्यांनी केले. तसेच वाढदिवस, सण-उत्सव यावेळी झाडे लावणे आणि बियाणे भेटी देणे आदी माध्यमातून पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्याचेही आवाहन केले. यावेळी त्यांनी जंगलातील वणवे रोखण्याचे आवाहन करणारी आणि रानमेव्याचे महत्त्व अधोरेखित करणारी दोन गाणीही म्हटली. तसेच उपस्थितांच्या शंकांचे समाधानही केले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी राहीबाई पोपेरे यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. संकरित वाणांचे दुष्परिणाम ओळखणारी आणि त्याच वेळी शुद्ध देशी बीजाचं महत्त्व लक्षात आणून देणारी महिला म्हणजे राहीबाई असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी राहीबाईंच्या कार्याला अभिवादन करतानाच जे कार्य राहीबाई शेतावर करत आहेत, तेच कार्य आपण विद्यापीठातल्या प्रयोगशाळेत करत असल्याबद्दल समाधान वाटत असल्याचे सांगितले. त्या म्हणाल्या, ज्या त्या भागामध्ये ज्या त्या देशी वाणाचे महत्त्व असते. जे आपल्या परिसरात पिकते, तेच खावे, असे म्हटले जाते. याला कारण तिथली माती असते. एका ठिकाणचे वाण दुसरीकडे नेऊन लावले, तर ते येते; मात्र त्यामध्ये ती चव उतरेलच असे नसते. याला कारण म्हणजे या वनस्पतींच्या मुळाशी विशिष्ट प्रकारचे जीवाणू वाढत असतात. हे जीवाणू त्या विशिष्ट पर्यावरणीय घटकांतच वाढतात. अशा वेळी संबंधित वनस्पती आणि जीवाणू यांचे सहजीवन फुलते. जीवाणू मातीतील आवश्यक घटक वनस्पतीला पुरवितात आणि तिला विशिष्ट चव आणि पोषणमूल्य प्राप्त होते. सर्वच प्रकारच्या रानभाज्यांना हे लागू पडते. दाहशमनार्थ त्या उपयुक्त ठरतात. या अभ्यास व संशोधनासाठीच ॲग्री बायोटेक्नॉलॉजी, मेटाजिनॉमिक्स, सॉईल मायक्रोबायोलॉजी इत्यादी आधुनिक विज्ञानशाखा निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.



कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून उद्घाटन करण्यात आले. डॉ. भारती पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. आसावरी जाधव यांनी परिचय करून दिला. ऊर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

कार्यक्रमास वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, निसर्गमित्र अनिल चौगुले, डॉ. नितीन माळी, प्रिया देशमुख यांच्यासह शिक्षक, शेतकरी महिला, नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

19 MAR 2026

सकाळ

# विद्यापीठात रंगला 'होस्टेल डे'



कोल्हापूर : होस्टेल डे कार्यक्रमात नृत्य सादर करताना विद्यार्थिनी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या फुगडी, गायन, एकांकिका अशा विविध १९ सांस्कृतिक स्पर्धांच्या माध्यमातून होस्टेल डे कार्यक्रम रंगला. त्यात विद्यार्थिनींनी कलागुणांचे सादरीकरण केले. या स्पर्धांचे बक्षीस वितरण कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थिनींमध्ये वाचनाची संस्कृती रुजणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले. उपकुलसचिव प्रिया देशमुख यांनी विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षेत अपयश आले, तरी चांगली मेहनत करून संकटांवर मात करावी आणि आयुष्य घडवावे, असे आवाहन केले. त्यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी नीलांबरी जगताप, वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी स्वागत केले. डॉ. कविता वड्राळे यांनी अहवाल वाचन केले. डॉ. मीना पोतदार यांनी आभार मानले.

19 MAR 2026

सिंधुदुर्ग समाचार

# विद्यापीठ विद्यार्थिनी वसतिगृहात हॉस्टेल डे उत्साहात

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** विद्यार्थिनींमध्ये वाचनाची संस्कृती रुजणे आवश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या हॉस्टेल डे कार्यक्रमात ते बोलत होते.

हॉस्टेल डेच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा रविवारी (दि. १५) पार पडला. स्पर्धा परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचा यावेळी सत्कार करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी, विद्यार्थिनीना आयुष्यात ध्येय ठरवून ते साध्य करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले यांचे विचारमूल्य डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थिनींनी आपले भविष्य घडवावे, असे मत व्यक्त केले. यावेळी उपकुलसचिव प्रिया देशमुख यांनी विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षेत अपयश आले, तरी चांगली मेहनत करून संकटावर मात करावी आणि आयुष्य घडवावे असे आवाहन केले. हॉस्टेल डे निमित्त फुगडी, गायन, एकांकिका इत्यादी वेगवेगळ्या १९ सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. कविता वड्राळे यांनी अहवाल वाचन केले. विद्यार्थिनींनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. मीना पोतदार यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. नीलांबरी जगताप, वॉर्डन, कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

19 MAR 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निसर्गाच्या शाळेनं मला जगण्याचं बळ दिलं

## पद्मश्री राहीबाई पोपेरे: शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानातून पर्यावरण वाचविण्याचा सल्ला

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

निसर्गच आपला खरा गुरु आहे. माती चांगली असेल तर अन्न चांगले येते, अन्न चांगले असेल तर माणूस निरोगी राहतो आणि पुढची पिढी सुदृढ घडते, असे प्रतिपादन बीजमाता 'पद्मश्री" राहीबाई पोपेरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, पर्यावरणशास्त्र अधिविभाग, यशवंतराव चव्हाण सेंटर फॉर रुरल डेव्हलपमेंट आणि समाजशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. 'देशी बियांचे संवर्धन आणि स्त्रियांची भूमिका" या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.



**कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना 'पद्मश्री" राहीबाई पोपेरे.**

मी कोणत्याही शाळेत शिकले नाही, पण निसर्गाच्या शाळेनं मला जगण्याचं खरं शिक्षण दिलं, तेच मी लोकांना सांगत असते, असे सांगत आपल्या आयुष्यातील कार्याचे किस्से उलगडले. पद्मश्री पोपरे म्हणाल्या, रासायनिक शेतीमुळे वाढणारे आजार, बदलती जीवनशैली आणि पारंपरिक अन्नधान्यापासून दूर जाण्याचे दुष्परिणाम आपण भोगले आहोत. त्यामुळेच देशी वाणांकडे वळले आहे. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी राहीबाई पोपेरे यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी जे कार्य राहीबाई शेतावर करत आहेत, तेच कार्य आपण विद्यापीठातल्या प्रयोगशाळेत करत असल्याबद्दल समाधान वाटत आहे.

डॉ. भारती पाटील यांनी स्वागत केले. डॉ. आसावरी जाधव यांनी परिचय करून दिला. ऊर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, निसर्गमित्र अनिल चौगुले, डॉ. नितीन माळी, प्रिया देशमुख आदी उपस्थित होते.

**शुद्ध, सात्विक खा**

राहीबाईनी पारंपरिक बियाण्यांचे जतन, सेंद्रिय शेती आणि 'किचन गार्डन" या संकल्पनांवर विशेष भर दिला. प्रत्येक घरात, प्रत्येक शेतात आणि अगदी शाळांच्या परिसरातही भाजीपाला पिकवण्याचे आवाहन त्यांनी केले. दिसायला सुंदर असलेले अन्न नेहमी आरोग्यासाठी चांगले असेलच असे नाही. कमी खा, पण शुद्ध, सात्विक खा, असा संदेश राहीबाई पोपरे यांनी दिला.